**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,**
**कोल्हापूर विभागीय मंडळ, राजेंद्रनगर, कोल्हापूर - ४१६ ००४**
Maharashtra State Board of Secondary & Higher Secondary Education,
Kolhapur Divisional Board, Rajendranagar, Kolhapur - 416 004

Phones: Chairman 0231-2690829 Secretary 0231- 2691405 FAX : [0231] 2690758
PBX - 0231-2696101, 2696102, 2696103 E-Mail: divsec.kop@gmail.com

क्र.को.वि.मं./शाखा लेखा/परीक्षा फी/२५७६
कोल्हापूर ४१६००४
दिनांक -१/२/२०२२

प्रति,
मुख्याध्यापक / प्राचार्य,
सर्व मान्यताप्राप्त शाळा व कनिष्ठ महाविद्यालय,
जिल्हा सातारा / सांगली / कोल्हापूर

**विषय - फेब्रुवारी - मार्च २०२१ परीक्षेचे इ. १० वी व इ. १२ वी च्या विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क परतावासाठी मुदतवाढ देणेबाबत.**

संदर्भ - १. राज्य मंडळ, पुणे यांचे क्र.रा.मं./लेखा-६/१०२ दिनांक १०/०१/२०२२ चे पत्र
२. राज्य मंडळ, पुणे यांचे क्र. रा.मं./लेखा-६/२४५, दिनांक १४/१/२०२२ चे पत्र
३. राज्य मंडळ, पुणे यांचे क्र. रा.मं./लेखा-६/५२३, दिनांक ३१/१/२०२२ चे पत्र

उपरोक्त संदर्भिय विषयास अनुसरून कळविण्यात येते की, मा. उच्च न्यायालय, मुंबई जनहित याचिका क्र. ३९/२०११ या याचिकेवरील दिनांक २९/०७/२०२१ रोजीचे आदेशानुसार मा. अध्यक्ष, राज्य मंडळ, पुणे यांनी फेब्रुवारी-मार्च २०२१ चे परीक्षेकरिता नोंदणी केलेल्या इ.१० वी व इ.१२ वीच्या विद्यार्थ्यांना अनुक्रमे रू ५९/- व ९४/- परीक्षा शुल्काची रक्कम परत करण्याबाबतचा निर्णय घेतलेला आहे. त्याअनुषंगाने आपणास आपल्या शाळेतील/कनिष्ठ महाविद्यालयातील फेब्रुवारी-मार्च २०२१ चे परीक्षेसाठी इ. १० वी व इ. १२ वीच्या नोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांची तपशीलवार माहिती दि.३१/१२/२०२१ पर्यंत संकलित करण्याबाबत स्पष्ट सूचना देण्यात आल्या होत्या. तथापि काही शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी अद्याप यासंदर्भात प्रस्ताव सादर केलेले नाहीत.

सबब सदर योजनेस दिनांक १५/०१/२०२२ व दि.३१/१/२०२२ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांना परीक्षा शुल्क परताव्याची नोंदणी करण्यास ऑनलाईन अडचणी येत असल्याने सदर योजनेस पुनश्च दि.२८/२/२०२२ पर्यत मुदतवाढ देण्यात येत आहे. तरी उपरोक्त कार्यवाही तातडीने कालमर्यादेत करण्यात यावी. सोबत सदर योजनेच्या कार्यपध्दतीच्या महत्त्वाच्या सूचना पत्र माहितीसाठी देण्यात येत आहे.

(सत्यवान सोनवणे)
**विभागीय सचिव,**
**कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर.**

[Type here]